# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १६२ | शनिवार, ३ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210







## संक्षिप्त

### पुण्यात दारू पिऊन गाड्या चालवणाऱ्या २०८ जणांवर कारवाई

**पुणे, ता. २ :** शहर वाहतूक विभागाने नववर्षाच्या सुरुवातीलाच मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कडक कारवाई केली आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ११ वाजेपासून १ जानेवारी २०२६ रोजी पहाटे ५ वाजेपर्यंत विशेष मोहीम राबविण्यात आली. या कालावधीत पुणे शहरातील विविध भागांमध्ये ४० ठिकाणी नाकाबंदी करून एकूण २१२८ वाहनांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या २०८ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ५१ वाहने मोटार वाहन कायद्यानुसार जप्त करण्यात आली असून, विविध उल्लंघनांपोटी ७० हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. दरम्यान, नाताळ आणि नववर्षाच्या पार्श्वभूमीवर २४ डिसेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पुणे शहरातील ३० वाहतूक विभागांमार्फत मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या ४८६ वाहनचालकांवर मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत कारवाई करण्यात आली.

# पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीची लढत पुन्हा चौरंगी होणार

## मतविभाजनातून भाजपला लाभ? महानगरपालिकेवर कोण झेंडा फडकावणार

**संतोष मुंडे**




पुणे, ता.२ : राज्यभरात महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. अनेक ठिकाणी युती-आघाड्यांची समीकरणे तयार झाली असून मैत्रीपूर्ण लढती होत आहेत. तर बऱ्याच ठिकाणी मित्रपक्ष राज्यात एकत्र असूनही महापालिकेत एकदुसऱ्यांच्या विरोधात दंड थोपटून प्रतिशोध घेण्याच्या भावनेतून लढा देण्याच्या तयारीत आहेत. पुणे महानगरपालिकेतही आगामी निवडणुकीत पुन्हा एकदा २०१७ सारखीच चौरंगी लढत पाहायला मिळणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. युती आणि आघाड्यांच्या राजकीय गणितात निर्माण झालेल्या गोंधळामुळे मतविभाजन होण्याची शक्यता वाढली असून, त्याचा थेट फायदा भाजपला होण्याची शक्यता असल्याचे राजकीय विश्लेषकांकडून सांगण्यात येत आहे. मतविभाजानामुळे भाजपने जाहीर केलेले मिशन १२५ प्लस प्रत्यक्षात उतरवण्यासाठी पोषक वातावरण ठरण्याची शक्यता आहे.

२०१७ साली झालेल्या महापालिका निवडणुकीत, पुण्यात चौरंगी लढत झाली होती. या लढतीत मतविभाजनाचा मोठा फायदा भाजपला झाला आणि भाजपचे तब्बल ९९ नगरसेवक निवडून आले होते. यावेळीही साधारण तशीच परिस्थिती निर्माण झालेली पाहायला मिळत आहे. निवडणूक जाहीर होताच भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची घोषणा केली. त्यामुळे भाजप-शिवसेना (शिंदे) युतीची चर्चा सुरू झाली होती. मात्र, त्यांच्यात जागावाटपावर एकमत न झाल्याने ही चर्चा निष्फळ ठरली. यानंतर भाजपने रिपब्लिकन पक्षाला सोबत घेऊन महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय जनता पक्षाने १५८ जागांवर उमेदवार दिले असून, ७ जागा रिपब्लिकन पक्षाला सोडण्यात आल्या आहेत.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे दोन्ही गट एकत्र येत आपापल्या चिन्हावर लढणार आहेत. यामुळे पुण्यातील राष्ट्रवादीच्या मतदारांमध्ये मतांचे विभाजन होणार नाही याची काळजी घेतली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष महाविकास आघाडीतून बाहेर पडल्यानंतर काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे यांनी स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे पुण्यात भाजप, शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडी अशी चौरंगी लढत रंगणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

या चौरंगी लढतीमुळे महापालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर मतविभाजन होण्याची शक्यता आहे. राजकीय जाणकारांच्या मते राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडी यांच्यात प्रामुख्याने धर्मनिरपेक्ष मतांचे विभाजन होईल. तर हिंदुत्ववादी मतांचा विचार करता शिवसेना आणि भाजपमध्ये काही प्रमाणात विभागणी होऊ शकते. मात्र, पुणे शहरात शिवसेनेची ताकद मर्यादित आहे. यामुळे भाजपला मानणाऱ्या हिंदुत्ववादी मतांमध्ये विभाजन न होता ही मते एकसंध राहण्याची शक्यता आहे. पुणे शहरातील गेल्या दशकभरातील निवडणुकींकडे पाहिले असता लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकांत भाजपने सातत्याने वर्चस्व राखल्याचे दिसून येत आहे. राममंदिर या भावनिक मुद्द्यामुळे तसेच शहरातील मेट्रो आणि इतर पायाभूत सुविधांच्या विकासकामांमुळे शहरात भाजपला अनुकूल असा मोठा मतदारवर्ग तयार झाला आहे. त्यातच चार नगरसेवकांचा एक प्रभाग अशी रचना केल्याने एका प्रभागात लाख ते दीड लाख मतदारांचा समावेश होत आहे. अशा मोठ्या प्रभाग रचनेचा फायदा यापूर्वीही भाजपलाच झाल्याचे दिसून आले आहे.

दरम्यान, एकूणच सध्याची राजकीय समीकरणे, मतविभाजनाची शक्यता आणि भाजपला मिळणारा विकासकामांचा लाभ पाहता, पुणे महापालिका निवडणूक भाजपसाठी अत्यंत अनुकूल ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

### कोणता पक्ष बाजी मारणार

पुणे शहरात मागच्या १० वर्षातील लोकसभा, विधानसभा आणि महानगर पालिकेच्या निवडणुकीत भाजपने एकहाती वर्चस्व निर्माण केले आहे. चौरंगी लढतीत इतर पक्षांमध्ये मतांचे विभाजन होऊन भाजपला हिंदुत्ववादी मते एकजूट मिळाल्याचे अगोदरही दिसून आले आहे. अशीच काहीशी परिस्थिती या निवडणुकीतही दिसून येत आहे. मात्र, या निवडणुकीत मतदार कोणाला आशीर्वाद देतील आणि कोणता पक्ष बाजी मारेल याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

# राज्यातील शिक्षकांच्या पगारावर संचमान्यतेची टांगती तलवार?



**पुणे, ता. २ :** राज्यातील शिक्षक भरतीप्रक्रियेत महत्त्वाचा बदल करत शाळांच्या संचमान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अखेर म्हणजे मे २०२६ पर्यंत संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन शिक्षक पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भातील शासननिर्णय प्रसिद्ध केला असून, या निर्णयामुळे येत्या काळात शिक्षक भरतीमधील पदांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक भरती पवित्र पोर्टलच्या माध्यमातून करण्यात येते. सध्या या भरतीप्रक्रियेत एकूण मंजूर पदांपैकी ८० टक्क्यांपर्यंत रिक्त पदे भरण्याची तरतूद आहे. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ च्या निकालाच्या आधारे ही पदभरती प्रक्रिया सुरू आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात शिक्षक सेवानिवृत्त होत असतात, तसेच संचमान्यतेनुसार नवीन रिक्त पदे उपलब्ध होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये यासाठी वेळेवर शिक्षक उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार कोणत्याही शाळेत १० टक्क्यांपेक्षा अधिक पदे रिक्त ठेवता येत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व स्तरांवरील शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अखेर संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन, अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ मधील गुणांच्या आधारे शिक्षक पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, आतापर्यंत संभाव्य रिक्त पदांचा विचार न केल्यामुळे अनेक पदे भरतीतून वगळली जात होती आणि ती रिक्तच राहत होती. नव्या निर्णयामुळे ही पदे भरती प्रक्रियेत समाविष्ट होणार असून, त्यामुळे शिक्षक संख्येत वाढ होणार आहे.

दरम्यान, शाळांतील आधार वैध विद्यार्थ्यांची २० ऑक्टोबर २०२५ रोजीची संख्या ग्राह्य धरून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी संचमान्यता निश्चित करण्यात आली आहे. ही संचमान्यता शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनला उपलब्ध करून देण्यात आली असून, तपासणी करून डिजिटल स्वाक्षरीनंतर शाळांना उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पायाभूत पदांबाबत अडचणी असलेल्या शाळांनी तातडीने प्रतिसाद द्यावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्व संचमान्यता १५ जानेवारीपर्यंत शाळांना देणे बंधनकारक असून, त्यानंतरही २०२५-२६ ची संचमान्यता न झालेल्या शाळांचे वेतन देण्यात येणार नाही, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

# कुख्यात गुंड निलेश घायवळ टोळीतील दोन गुन्हेगारांना अटक

**अमित मुंडीक**



पुणे, ता. २ : कोथरूड पोलीस स्टेशन हद्दीत मोक्का अंतर्गत गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या निलेश घायवळ टोळीतील दोन आरोपींना कोथरूड पोलिसांनी अटक करत मोठी कारवाई केली आहे. कोथरूड पोलीस ठाण्यात विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेले मनीष रामकृष्ण माथवड (वय २८, रा. शोभा संकुल अपार्टमेंट, गणेश कॉलनी, कोथरूड) आणि चिक्या उर्फ ओंकार शाम फाटक (वय २६, रा. संत ज्ञानेश्वर कॉलनी, कोथरूड) या दोघांना अटक करण्यात आली आहे.

या दोन्ही आरोपींवर भारतीय न्याय संहिता अंतर्गत कलम ११(२), १८९(१)(२), १९१(२)(३), १९०, ३२९(४), ३०८(२)(४)(५), ३५२, ३५१(१)(३), २९६ तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(२५) आणि क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कायदा कलम ३ व ७ अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणांमुळे संबंधित आरोपींविरोधात मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.

कोथरूड पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकातील पोलीस अंमलदार विष्णू राठोड आणि आकाश वाल्मिकी यांना गेल्या ८ दिवसांपासून आरोपी कोथरूड परिसरात येणार असल्याची माहिती मिळत होती. त्या माहितीनुसार पोलीस उपनिरीक्षक मोहन चव्हाण, पोलीस अंमलदार विष्णू राठोड आणि आकाश वाल्मिकी यांनी सापळा रचला. ३१ डिसेंबर रोजी पेट्रोलिंगदरम्यान आरोपी कोथरूड परिसरात आढळून आले. त्यानंतर तात्काळ कारवाई करत दोघांनाही ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलीस उपायुक्त संभाजी कदम (परिमंडळ ३, पुणे शहर), सहाय्यक पोलीस आयुक्त शीतल जानवे (कोथरूड विभाग), वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) अनिल माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आळेकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कदम, तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक मोहन चव्हाण तसेच पोलीस अंमलदार विष्णू राठोड, आकाश वाल्मिकी, मयूर पांढरे आणि प्रवीण मांडवकर यांनी सहभाग घेतला.

# प्रसिद्ध रीलस्टार अथर्व सुदामे याला पीएमपी प्रशासनाकडून नोटीस



**पुणे, ता. २ :** पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) बसमध्ये विनापरवानगी चित्रीकरण करून सोशल मीडियावर रील प्रसारित केल्याप्रकरणी पुण्यातील एका प्रसिद्ध रीलस्टार अथर्व सुदामे याला नोटीस बजावली आहे. अथर्व सुदामे हा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय असून, त्याच्या इन्स्टाग्रामवरील रील्सना लाखो लोक पाहतात. मात्र, पीएमपीएमएलच्या बसमध्ये चित्रीकरण करून ते सोशल मीडियावर प्रसारित केल्याने हा प्रकार वादात सापडला आहे.

पीएमपीएमएलकडून जारी करण्यात आलेल्या नोटीस नुसार, संबंधित रीलमध्ये महामंडळाच्या मालकीच्या बसमध्ये चित्रीकरण करण्यात आले होते. या दरम्यान महामंडळाचा गणवेश, ई-तिकीट मशीन तसेच बॅच-बिल्ला यांचा वापर कोणतीही अधिकृत परवानगी न घेता करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. हे चित्रीकरण थेट इन्स्टाग्रामवर अपलोड करून प्रसारित करण्यात आले होते.

महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, या रीलमध्ये महिला प्रवाशांचे अवमान करणारे आणि अपमानास्पद चित्रण दिसून येत आहे. त्यामुळे महिला प्रवाशांच्या सन्मान, प्रतिष्ठा आणि मानसिक सुरक्षिततेवर परिणाम होत असल्याचा ठपका पीएमपीएमएलने ठेवला आहे. तसेच अशा प्रकारच्या कृतीमुळे सार्वजनिक बससेवेवरील विश्वासाला धक्का बसत असून, महामंडळाची प्रतिमा जनमानसात मलिन होत असल्याचेही नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर पीएमपीएमएलने संबंधित रील तात्काळ सोशल मीडियावरून हटवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच भविष्यात महामंडळाच्या सक्षम प्राधिकरणाची लेखी परवानगी घेतल्याशिवाय कोणतेही फोटो, व्हिडिओ किंवा रील प्रसारित करू नयेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. नोटीस प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले असून, मुदतीत खुलासा न दिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# सोरतापवाडी येथे शेतकरी वर्गासाठी आज विशेष आरोग्य शिबिर; सुदर्शन चौधरी यांची माहिती

**उरुळी कांचन, ता. २ :** शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे कारण तो अन्नपुरवठा, कच्चा माल आणि रोजगार यांचा मुख्य स्रोत आहे, जो देशाच्या अन्नसुरक्षेचा पाया रचतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देतो, ज्यामुळे शेतीचा विकास आणि शेतकऱ्यांचे कल्याण देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आरोग्यासाठी एक पाऊल, बळीराजाच्या आरोग्यासाठी या उपक्रमांतर्गत तपासण्या व मोफत औषधोपचार करण्यात येणार आहेत. या शिबिराचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा. असे आवाहन पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुदर्शन चौधरी यांनी सांगितले आहे.

सोरतापवाडी (ता. हवेली) येथे एक पाऊल, बळीराजाच्या आरोग्यासाठी या शिबिराचे आयोजन शनिवारी (ता. ३) करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन शेतकरी वर्गाच्या हितासाठी कायम प्रयत्नशील असलेल्या पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिरात रुबी हॉल क्लिनिक, जहांगीर हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल, संचेती हॉस्पिटल, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पूना हॉस्पिटल, औंध जिल्हा रुग्णालय, ससून हॉस्पिटल, आदित्य बिर्ला हॉस्पिटल, पुणे, एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल, भारती हॉस्पिटल, डॉ. डी. वाय.पाटील मेडिकल कॉलेज,सौ. काशीबाई नवले हॉस्पिटल आणि इतर २५ नामांकित हॉस्पिटल्स सहभागी होणार आहेत. या शिबिरात तपासणी ते शस्त्रक्रिया सर्व काही विनामूल्य केले जाणार आहे. यामध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया,




किडनी ट्रान्सप्लांट, खुबा प्रत्यारोपण, गुडगा प्रत्यारोपण, कॅन्सर शस्त्रक्रिया, लहान मुलांच्या हृदयातील छिद्र, मेंदूची शस्त्रक्रिया, हृदयाची शस्त्रक्रिया, लिव्हर ट्रान्सप्लांट, मणक्याची शस्त्रक्रिया, अस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया, हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया, मूत्ररोग तपासणी व शस्त्रक्रिया, जनरल तपासणी व शस्त्रक्रिया, सांधे व खुबा प्रत्यारोपण तपासणी व शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार तपासणी व शस्त्रक्रिया, रक्तविकार तपासणी व शस्त्रक्रिया, कान-नाक-घसा तपासणी व शस्त्रक्रिया, बालरोग तपासणी व शस्त्रक्रिया होणार आहे.

त्याच्याबरोबर किडनी व लिव्हर प्रत्यारोपण तपासणी व शस्त्रक्रिया, स्त्री रोग तपासणी व शस्त्रक्रिया, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, तसेच मोफत चष्मे वाटप, दंतरोग तपासणी व उपचार, मोफत डायलेसिस, मोफत मॅमोग्राफी, मोफत एक्स रे,पोटविकार (गॅस्ट्रो) तपासणी, टू डी इको, एमआयआर, सिटी स्कॅन, सोनोग्राफी,या सर्व महागड्या तपासन्या आणि सहभागी रुग्णांच्या सर्व रक्त चाचण्या मोफत करण्यात येतील. तसेच दिव्यांगांसाठी मोफत आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय आणि हात व कॅलिपर्स वाटपासाठी तपासणी शिबीरदेखील होणार आहे. अशी माहिती सुदर्शन चौधरी यांनी दिली आहे.

## संक्षिप्त



### पुण्यात मसाज पार्लरच्या नावाखाली सुरु असलेल्या देहविक्रीचा पर्दाफाश

**येरवडा, ता. २ :** येरवडा पोलिसांनी कल्याणीनगरमधील एका हायप्रोफाईल मसाज पार्लरवर छापा टाकून देहविक्री व्यवसायाच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या मसाज सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली देहविक्री व्यवसाय सुरू असल्याची खात्रीशीर बातमी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली. या छाप्यात पोलिसांनी ३१ वर्षांचा मोतीबर रेहमान आणि १९ वर्षांचा अब्दुल आवाल या दोन व्यवस्थापकांना अटक केली आहे. तसेच तेथून काही तरुणींची सुटका करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे मसाज पार्लर कल्याणीनगरमधील एका नामांकित संकुलात चालवले जात होते. पोलिसांनी घटनास्थळावरून देहविक्रीशी संबंधित पुरावे हस्तगत केले आहेत. या प्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास वरिष्ठ पोलीस अधिकारी करत आहेत. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरात अशा अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम हाती घेतली आहे. याआधी बाणेर, कोंढवा आणि कात्रज भागातही पोलिसांनी अशाच प्रकारच्या अवैध अड्ड्यांवर छापे टाकून कारवाई केली होती. मसाज पार्लरच्या नावाखाली गैरप्रकार करणाऱ्यांवर इथून पुढेही कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.

### महिलेला मारहाण करून दागिने लुटले

**पुणे, ता. २ :** पुणे शहर आणि लगतच्या भागात गुन्हेगारीच्या दोन अतिशय गंभीर घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. पहिली घटना वडगाव बुद्रुक येथील सिंहगड कॅम्पस परिसरात घडली असून येथे एका महिलेचे मंगळसूत्र हिसकवण्यात आले आहे. सायंकाळच्या सुमारास परिसरातून चालली असताना ८ जणांच्या टोळक्याने तिला अचानक गाठले. या टोळक्यामध्ये ५ पुरुष आणि ३ महिलांचा समावेश होता. या सर्वांनी मिळून पीडितेला बेदम मारहाण केली आणि तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेले. या घटनेमुळे पीडित महिला इतकी हादरली होती की तिने भीतीने अनेक दिवस कोणालाही काही सांगितले नाही. अखेर तिच्या पतीने सिंहगड रोड पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून सध्या सीसीटीव्हीच्या आधारे तपास सुरू आहे. दरम्यान, चाकण परिसरात किरकोळ कारणावरून एका २३ वर्षीय तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. काही लोकांनी या तरुणाला थांबवून त्याच्या एका मित्राचा ठावठिकाणा विचारला होता. मात्र, तरुणाने आपल्याला काहीही माहिती नसल्याचे सांगितल्यामुळे आरोपींचा राग अनावर झाला. केवळ माहिती दिली नाही या रागातून ३ जणांनी मिळून या तरुणाला लाथाबुक्क्यांनी आणि दगडाने गंभीर मारहाण केली. या हल्ल्यात तरुण जखमी झाला असून चाकण पोलिसांनी या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### मंगल काळभोर यांचे निधन



**लोणी काळभोर, ता.२ :** येथील जुन्या पिढीतील मंगल चंद्रकांत काळभोर (वय- ७६) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यां पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुलं, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. उद्योजक सतीश काळभोर व पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूलमधील शिक्षक राजू काळभोर यांच्या त्या मातोश्री होत.

### यशोदा काळभोर यांचे निधन



**लोणी काळभोर, ता. २ :** येथील यशोदा आनंदराव काळभोर (वय - ७४) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. लोणी काळभोर स्टेशन येथील हिंद फिटनेसचे संदेश काळभोर यांच्या त्या मातोश्री होत.

# राज्यात जिल्हा परिषद निवडणुकांची तयारी अंतिम टप्प्यात; २८ जानेवारीला मतदान होण्याची शक्यता

**मुंबई, ता. २ :** राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकांसाठी हालचालींना वेग आला आहे. प्रचारासाठी आता अवघे १० ते दिवस शिल्लक राहिले असून, दुसरीकडे जिल्हा परिषद निवडणुकांची तयारी जवळपास अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. २८ जानेवारीला जिल्हा परिषदेची निवडणूक पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




**६ व ७ जानेवारी रोजी आयोगाची महत्त्वाची बैठक**

३१ जानेवारी पर्यंत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकांच्या तारखा ठरवण्यासाठी ६ व ७ जानेवारी रोजी महत्त्वाची बैठक बोलावली असल्याची माहिती मिळत आहे.

या बैठकीला संबंधित जिल्हा परिषदेचे अधिकारी तसेच पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. निवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही सविस्तर चर्चा केली जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

**आयोगाच्या बैठकीतच मतदानाच्या अंतिम तारखांवर शिक्कामोर्तब**

जिल्हा परिषद निवडणुकांसाठी आवश्यक ईव्हीएम उपलब्ध असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, सध्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर गुंतलेले आहे. हे मनुष्यबळ मोकळे झाल्यानंतरच जिल्हा परिषदांसाठी मतदान प्रक्रिया राबवली जाऊ शकते. त्यामुळे ७ व ८ तारखेला होणाऱ्या आयोगाच्या बैठकीतच मतदानाच्या अंतिम तारखांवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.


**केवळ १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांमध्येच निवडणुका**

सध्या राज्यातील ओबीसी आरक्षणासंदर्भातील निर्णयामुळे केवळ १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांमध्येच निवडणुक घेता येणार आहे. राज्यातल्या अनेक जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली गेली आहे. या ठिकाणी इतर समाजघटकांनाही निवडणूक लढता यावी त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून निवडणुका स्थगित करण्यात आल्या होत्या.

दरम्यान, जिल्हा परिषद निवडणुकांसाठी २५ जानेवारीच्या आसपास मतदान होऊ शकते असे बोलले जात आहे. महानगर पालिकेच्या आचारसंहितेचा कालावधी लक्षात घेऊन मतदानाच्या तारखा निश्चित केल्या जातील अशी शक्यता आहे. २५ जानेवारीला शक्य नसेल तर मग २८ जानेवारी रोजी मतदान घेण्यात येण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे.

## पुण्यात प्रस्थापितांचे वारसदार निवडणुकीच्या मैदानात; कोण किती कोटींचा मालक?

**पुणे, ता. २ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, उमेदवारांनी जाहीर केलेल्या संपत्तीच्या तपशिला मुळे सध्या शहरात मोठी चर्चा सुरू झाली आहे. या निवडणुकीत अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधींचे मुलं-सुनांना उमेदवारी देण्यात आली असून, यात प्रामुख्याने आमदार बापूसाहेब पठारे यांचे चिरंजीव सुरेंद्र पठारे हे सर्वात श्रीमंत उमेदवार ठरले आहेत.



सुरेंद्र पठारे यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात कुटुंबाची एकूण मालमत्ता २७१ कोटी ८५ लाख रुपये असल्याचे जाहीर केले आहे. त्यांच्याकडे मर्सिडीज आणि बीएमडब्ल्यू सारख्या महागड्या गाड्यांचा ताफा असून, त्यातील स्थावर मालमत्ताच २१७ कोटी रुपयांची आहे.या यादीत दिवंगत आमदार रमेश वांजळे यांची कन्या सायली वांजळे यांचाही समावेश असून त्यांची मालमत्ता ७७ कोटी ६५ लाख रुपये इतकी आहे. तसेच दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या सून स्वरदा बापट यांनी आपली संपत्ती ११ कोटी २२ लाख रुपये असल्याचे नमूद केले आहे.

या 'हाय-प्रोफाईल' उमेदवारांमध्ये बहुतांश जण कोट्यधीश आहेत. सर्वाधिक श्रीमंत ठरलेल्या सुरेंद्र पठारे यांनी बी.टेक. पर्यंत शिक्षण पूर्ण केले असून त्यांच्यावर सुमारे ४६ कोटी रुपयांचे कर्ज असल्याचेही स्पष्ट झाले आहे. स्थावर मालमत्तेमध्ये त्यांच्याकडे प्रामुख्याने जमिनी आणि व्यावसायिक इमारतींचा मोठा वाटा आहे.

पुणे महापालिकेच्या या निवडणुकीत कुणाल टिळक, चंद्रशेखर निम्हण आणि रवींद्र धंगेकर यांच्यासारख्या अनेक प्रस्थापितांच्या वारसदारांचे भवितव्य पणाला लागले आहे. या उमेदवारांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांमुळे पुण्यातील राजकीय कुटुंबांची आर्थिक ताकद पुन्हा एकदा समोर आली आहे. आता या कोट्यधीश वारसदारांना पुण्यातील जनता निवडून आणणार का की नवीन उमेदवाराला संधी देणार? ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे.



## पुण्यात चार दिवस हुडहुडी राहणार

**पुणे, ता. २ :** नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच पुणेकर हाडं गोठवणाऱ्या थंडीचा अनुभव घेत आहेत. शुक्रवारी पुण्यातील किमान तापमानात लक्षणीय घट झाली असून शहरात निचांकी ११°C ते १३°C दरम्यान तापमानाची नोंद झाली आहे. उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांच्या प्रवाहामुळे संपूर्ण पुणे जिल्हा गारठला असून, पहाटेच्या वेळी अनेक भागांत धुक्याची चादर पाहायला मिळाली.

आजच्या हवामानाचे ठळक मुद्दे:

आज कमाल तापमान २९°C ते ३०°C पर्यंत राहण्याची शक्यता आहे, तर किमान तापमान ११°C च्या आसपास राहील. दिवसभर आकाश प्रामुख्याने निरभ्र असेल. पावसाची कोणतीही शक्यता वर्तवण्यात आलेली नाही. पहाटेच्या वेळी धुक्यामुळे दृश्यमानता कमी असल्याने वाहन चालवताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शहरातील काही भागांत हवेची गुणवत्ता 'मध्यम' ते 'अस्वस्थ' श्रेणीत नोंदवण्यात आली आहे.

पुढील अंदाज : हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील १-४ दिवस पुण्यात थंडीचा जोर असाच कायम राहणार आहे. विशेषतः पाषाण, हवेली आणि मावळ पट्ट्यात तापमानाचा पारा अधिक खाली जाण्याची शक्यता आहे.

## विधवा महिलेने जीन्स घातल्यामुळे सासरच्यांकडून मारहाण

**पुणे, ता. २ :** पुण्यातील सहकारनगर भागात एका महिलेने फक्त जीन्स घातली म्हणून तिला तिच्याच सासरच्या मंडळींनी आणि जन्मदात्या मुलीने बेदम मारल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही पीडित महिला ३३ वर्षांची असून पतीच्या निधनानंतर ती कचरावेचक म्हणून काम करून आपल्या ४ मुलांचा सांभाळ करते. ३० डिसेंबर रोजी ही महिला जीन्स घालून घराबाहेर उभी असताना हा संपूर्ण प्रकार घडला.



तिच्या सासूने कपड्यांवरून वाद उकरून काढला आणि सुनेला अश्लील शिवीगाळ करत मारहाण केली. आईला वाचवण्यासाठी मोठी मुलगी पुढे येईल असे वाटले होते, पण मुलीनेही स्वतःच्या आईलाच मारहाण केली. त्याच वेळी पीडितेच्या दिराने तिचा हात इतक्या जोरात पिरगळला की, तिच्या मनगटाचे हाड मोडले. या टोळक्याने महिलेचा मोबाईल हिसकावून घेत तिच्या लहान मुलांनाही धक्काबुक्की केली.

जखमी महिलेला उपचारासाठी ससून रुग्णालयात भरती करण्यात आले असून तिच्या हाताला गंभीर फ्रॅक्चर झाले आहे. या प्रकरणी सहकारनगर पोलिसांनी सासू, दीर आणि मुलीविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे. कपडे काय घालावेत यावरून घरातल्यांनीच असा हल्ला केल्यामुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे. पोलीस आता या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे.

## पुण्यातील बनावट वकिलावर फसवणुकीचे गंभीर आरोप

**पुणे,ता.१ :** पुण्यातून बनावट वकील असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, गेल्या अनेक वर्षांपासून स्वतःला वकील भासवून नागरिकांची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप अरविंद राजाराम सूर्यवंशी उर्फ अविनाश पाटील याच्यावर करण्यात आला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित इसमाने गेल्या ७ते८ वर्षांपासून पुण्यातील जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर तसेच कोल्हापूर, ठाणे, सातारा, सांगली आणि मुंबई उच्च न्यायालयात वकिली व्यवसाय करत असल्याचे भासवले. इतकेच नव्हे तर सिंहगड रोडवरील एका हिरो टू-व्हीलर शोरूमच्या वर वकिलांचे कार्यालय सुरू करून तो लोकांना कायदेशीर सल्ला देत असल्याचा बनाव करत होता, असा आरोप आहे.

या प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित इसमाने ॲड. गोपाळ जगन्नाथ भोसले या खोट्या नावाने स्वतःला वकील म्हणून सादर केले, तर प्रत्यक्षात तो नोंदणीकृत वकील नसल्याचे समोर येत आहे. या माध्यमातून त्याने अनेक नागरिकांकडून कोट्यवधी रुपयांची रक्कम उकळल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, या इसमाविरुद्ध निगडी पोलीस स्टेशनमध्ये यापूर्वीही गुन्हा दाखल असल्याची माहिती आहे. गुंतवणूकदारांना जादा परताव्याचे आमिष दाखवून १ कोटी ७७ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला होता. या गुन्ह्यात २०१४ साली जामिनावर सुटल्यानंतर आरोपी आणि त्याची पत्नी सौ. नंदा अरविंद सूर्यवंशी हे दोघेही फरार असल्याचा आरोप आहे.

आरोपानुसार, पती-पत्नीने मिळून स्वतःला वकील असल्याचे भासवत अनेकांची आर्थिक फसवणूक केली. या प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली असून, संबंधित इसमांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता पुढे येत आहे.

## दौंडचे माजी नगरसेवक नंदू पवार यांना 'स्वीकृत नगरसेवक' करण्याची मागणी

**पुणे, ता. २ :** दौंड नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घवघवीत यश संपादन केले असून, शहराच्या नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या दुर्गादेवी जगदाळे या विराजमान झाल्या आहेत. नगराध्यक्षपदासह राष्ट्रवादीचे ९ नगरसेवकही विजयी झाल्याने पालिकेत पक्षाची ताकद वाढली आहे. या विजयाचा जल्लोष सुरू असतानाच, आता अनुभवी माजी नगरसेवक नंदू पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून 'स्वीकृत नगरसेवक' म्हणून संधी द्यावी, अशी जोरदार मागणी दौंडकरांकडून करण्यात येत आहे.



दौंड शहराच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसने आपली पकड पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. नवनिर्वाचित ९ नगरसेवक आणि नगराध्यक्ष यांच्या सोबतीला प्रशासकीय कामाचा अनुभव असणारा चेहरा म्हणून जेष्ठ नेते नंदू पवार यांचे नाव आघाडीवर आहे. पवार यांनी यापूर्वी नगरसेवक म्हणून काम करताना आपली 'सुसंस्कृत आणि अभ्यासू लोकप्रतिनिधी' अशी प्रतिमा निर्माण केली आहे तसेच स्वभावाने शांत असणारे मात्र विकास कामाच्या बाबतीत सभागृहात दोन हात करण्याची तयारी ठेऊ शकतात त्यामुळे शहराला समतोल साधणारा चेहरा देण्याची मागणी होत आहे

नंदू पवार यांच्या अनुभवाचा फायदा शहराला होणार: जरी राष्ट्रवादी काँग्रेसकडे बहुमत नसले तरी नगराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा असल्याने शहराच्या विकासाची मोठी जबाबदारी पक्षावर राहणार आहे. नवनिर्वाचित नगरसेवकांमध्ये अनेक तरुण चेहऱ्यांचा समावेश आहे. अशा परिस्थितीत, नगरपरिषदेच्या कामकाजाचे नियम आणि तांत्रिक बाबींची जाण असणाऱ्या नंदू पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याची सभागृहात गरज असणार आहे.

नंदू पवार यांची 'स्वीकृत सदस्य म्हणून' नियुक्तीमुळे राष्ट्रवादीची सभागृहातील बाजू अधिक भक्कम होईल तसेच नंदू पवार यांची सर्वसामान्य जनतेशी असलेला त्यांचा दांडगा संपर्क आणि वादविरहित व्यक्तिमत्व यामुळे त्यांना संधी दिल्यास शहराच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी भावना व्यक्त केली जात आहे. यावर पक्षाचे वरिष्ठ नेते काय निर्णय घेतात आणि कुणाला संधी मिळते याची वाट पहावी लागणार आहे.

## पुणे महानगरपालिका निवडणुकीत भाजपच्या मनिषा नागपुरे बिनविरोध

**पुणे, ता. २ :** पुणे शहरात होणाऱ्या पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी ४१ प्रभागांतील एकूण १६५ जागांसाठी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणावर उमेदवारी अर्ज दाखल झाले असून, एकूण ३,०५९ उमेदवारांनी अर्ज भरले होते. यापैकी छाननी प्रक्रियेत १७४ उमेदवारी अर्ज बाद करण्यात आले आहेत. त्यामुळे छाननीनंतर २,७०३ उमेदवारी अर्ज वैध ठरले असून, हे उमेदवार सध्या निवडणुकीच्या रिंगणात आहेत.



आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे अंतिम टप्प्यात नेमके किती उमेदवार निवडणूक लढवणार आहेत, हे चित्र आज स्पष्ट होणार आहे. अनेक प्रभागांमध्ये राजकीय पक्षांकडून समन्वय साधत काही उमेदवारांनी अर्ज मागे घेण्याची शक्यता असून, त्याचा थेट परिणाम निवडणुकीतील चुरशीवर होणार आहे.

दरम्यान, पुणे महापालिका निवडणुकीत पहिला बिनविरोध निकाल जाहीर झाला आहे. भाजपच्या उमेदवार मनिषा नागपुरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. प्रभाग क्रमांक ३५ सनसिटी माणिक बाग येथून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्या सलग तिसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या होत्या.

अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांच्या प्रभागातील उर्वरित तिन्ही उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्यामुळे मनिषा नागपुरे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यामुळे पुणे महापालिका निवडणुकीत भाजपाला पहिले यश मिळाले आहे. मनिषा नागपुरे यांच्या बिनविरोध निवडीनंतर परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत आनंद व्यक्त केला. तसेच मिठाई वाटप करून हा विजय साजरा करण्यात आला. आता अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुण्यातील सर्व ४१ प्रभागांमधील अंतिम उमेदवारांची संख्या स्पष्ट होणार असून, त्यानंतर निवडणुकीची खरी रंगत वाढण्याची शक्यता आहे.

### कात्रज येथे रुग्ण तपासणीचा बहाणा करून डॉक्टरला लुटले

**पुणे, ता. २ :** पुण्यातील कात्रज परिसरात डॉक्टरला रुग्ण तपासणीच्या बहाण्याने बोलावून लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ३१ डिसेंबर रोजी रात्री ९ च्या सुमारास दोन अनोळखी तरुण डॉक्टरांच्या दवाखान्यात आले. एक रुग्ण अतिशय गंभीर असून त्याला तातडीने तपासण्याची गरज आहे, अशी खोटी बतावणी त्यांनी केली. एका ४९ वर्षीय डॉक्टरांनी माणुसकी दाखवत त्यांच्यासोबत जाण्याचे मान्य केले, पण पुणे-सातारा रस्त्यावरील अथर्व परिहाज इमारतीच्या निर्जन ठिकाणी नेताच चोरट्यांनी चाकूचा धाक दाखवला. दरम्यान, झटापटीत एका चोरट्याने चाकूने वार करून डॉक्टरांना जखमी केले. त्यानंतर चोरट्यांनी डॉक्टरांची दुचाकी, मोबाईल, ३० हजार रुपयांची रोकड आणि पिशवीतील १ लाख रुपये किमतीचा चांदीचा जग असा मोठा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावून नेला.

# अनैतिक संबंधांच्या संशयावरून महिलेवर ॲसिड हल्ला



**पुणे, ता. २ :** पुणे शहरात एका ३२ वर्षीय महिलेवर दोन महिलांनी मिळून भयानक हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. शिवणे परिसरातील एनडीए रोडवर ३० डिसेंबर रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता हा प्रकार घडला. अनैतिक संबंधांच्या संशयावरून हा हल्ला करण्यात आला असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

या घटनेतील आरोपी महिलेला तिचा पती आणि पीडित महिला यांच्यात संबंध असल्याचा संशय होता. याच रागातून आरोपी महिला आणि तिच्या एका मैत्रिणीने पीडितेची वाट अडवली. त्यांनी सुरुवातीला तिला बेदम मारहाण केली आणि त्यानंतर दगडाने तिच्या चेहऱ्यावर वार केले. हा राग इतक्यावरच थांबला नाही, तर आरोपींनी पीडितेच्या तोंडावर बाटलीत आणलेले सिडसारखे जळजळणारे रसायन ओतले.

या जीवघेण्या हल्ल्यात पीडित महिला गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या तिच्यावर उपचार सुरू असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच उत्तमनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस आता पीडितेच्या अंगावर फेकलेले रसायन नक्की कोणते होते, हे शोधण्यासाठी मेडिकल रिपोर्ट आणि फॉरेन्सिक पुराव्यांची वाट पाहत आहेत. या धक्कादायक घटनेमुळे शिवणे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलीस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.

# पुण्यात राष्ट्रवादीचं 'ठरलं'; उमेदवार ज्याचा, प्रभाग त्याचा, दोन्ही राष्ट्रवादीमध्ये समोपचाराने तोडगा

**पुणे, ता. २ :** पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये निर्माण झालेला वादग्रस्त जागांचा तिढा अखेर सुटल्याची माहिती समोर आली आहे. अजित पवार यांच्यासोबत झालेल्या बैठकीत समोपचाराने तोडगा निघाल्याचे सांगण्यात येत आहे. या बैठकीनंतर अंकुश काकडे यांनी माध्यमांशी बोलताना दुपारी ३ नंतर जागावाटपाचे अंतिम चित्र स्पष्ट होईल, अशी माहिती दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येत पुणे महापालिकेच्या एकूण १६५ जागांवर निवडणूक लढवणार आहेत. काही प्रभागांमध्ये दोन्ही पक्षांचे उमेदवार एकाच जागेवरून अर्ज भरल्यामुळे मतभेद निर्माण झाले होते. मात्र वरिष्ठ पातळीवरील चर्चेनंतर हे मतभेद मिटवण्यात आले आहेत.


याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष सुनील टिंगरे यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितले की, काही प्रभागांमध्ये दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. मात्र ज्या उमेदवाराची निवडून येण्याची क्षमता अधिक आहे, त्यालाच त्या प्रभागातून संधी दिली जाणार आहे. यासाठी संबंधित उमेदवारांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

सुनील टिंगरे यांनी सांगितले की, सध्या ९ ठिकाणी दोन्ही पक्षांचे उमेदवारी अर्ज आहेत. अशा ठिकाणी समन्वयाने तोडगा काढला जाईल. आमच्या गटाकडून १२५ एबी फॉर्म दिले गेले असून, दुसऱ्या गटाकडून ३५ पेक्षा जास्त एबी फॉर्म देण्यात आले होते. दोन्ही राष्ट्रवादी पक्षांसह खरात गटाचीही युती या निवडणुकीत असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीनंतर दोन्ही पक्षांतील नेत्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, पुणे महापालिका निवडणुकीत एकत्रित ताकदीने मैदानात उतरण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत राष्ट्रवादीची भूमिका अधिक मजबूत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# एमपीएससीच्या विद्यार्थ्यांची मनोज जरांगे-पाटील घेणार भेट



**पुणे, ता. २ :** मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी अचानक आपले सगळे नियोजित दौरे रद्द केले आणि थेट पुण्याच्या दिशेने रवाना झाले. त्याआधी आज त्यांनी शिर्डीमध्ये साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.साई दर्शनानंतर त्यांनी सांगितले की, नवीन वर्षाच्या निमित्ताने साईबाबांच्या चरणी दर्शन घेतलं. राज्यातील जनता, शेतकरी सुखी-समाधानी राहावेत, हीच प्रार्थना केली.

दरम्यान, मराठा आरक्षणासाठी पुन्हा आंदोलन होणार का? असा प्रश्न विचारला असता, जरांगे पाटील म्हणाले, मला वाटत नाही पुन्हा आंदोलनाची वेळ येईल. विखे पाटलांनी जबाबदारी घेतली आहे आणि समाजाने मुख्यमंत्री तसेच विखे पाटलांवर विश्वास ठेवला आहे. मराठवाड्यासाठी जीआर निघालेला आहे. सगळं काम त्याच पद्धतीने होईल, असं आम्हाला सांगण्यात आलं आहे. पण जर आंदोलनाची वेळ आलीच, तर ती सरकारसाठी अडचणीची ठरेल. मला समाजापेक्षा मोठं काही नाही.

मग अचानक पुण्याला जाण्याचं कारण काय? यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले, एक ते दीड लाख एमपीएससी विद्यार्थी सरकारच्या चुकीमुळे विनाकारण अडचणीत सापडले आहेत. स्वतःची काहीही चूक नसताना या विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडणं म्हणजे मोठी शोकांतिका आहे. या मुद्द्यावर मी मुख्यमंत्र्यांच्या ओएसडी सोबत आणि विखे पाटलांशीही चर्चा केली आहे. त्यामुळे मी तातडीने पुण्याला जात आहे आणि एमपीएससी विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेणार आहे. या गंभीर प्रश्नावर तात्काळ तोडगा काढावा, असा निरोप मी मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवला आहे.



# बिबट्याच्या हल्ल्यात कुत्र्याचा मृत्यू

**पिंपरी सांडस, ता. २ :** बिबट्याने कुत्र्यावर हल्ला करून ठार केल्याची घटना घडली आहे. ही घटना पिंपरी सांडस (ता. हवेली) परिसरात घडली असून गुरुवारी (ता.१) सकाळी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पिंपरी सांडस येथील हरपळे वस्ती, भोरडे मळा परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात दोन दिवसापूर्वी सोमनाथ गडदे यांच्या मेंढीचा मृत्यू झाला आहे. महिला मेंढपाळावरही बिबट्याने धावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली. तसेच नवनाथ रामभाऊ हरपळे यांच्या पाळीव कुत्र्याला रात्रीच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून ठार केले आहे. बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव कुत्र्याचा मृत्यू झाल्याने लहान मुलाच्या डोळ्यात अश्रू तरळले होते.दरम्यान, पाळीव प्राणी व मेंढ्या वरती होणारे हल्ले हे गेल्या बऱ्याच दिवसापासून होत आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिकांनी पिंजरे लावण्याची मागणी केली आहे, परंतु वन विभागाकडून अजून गांभीर्याने दखल घेतली नसल्याची बाब समोर येत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये दोन उमेदवारांना दोन पक्षांकडून अधिकृत उमेदवारी

**पिंपरी-चिंचवड, ता. २ :** राज्यात तिकीट वाटपानंतर अनेक ठिकाणी उमेदवारांची रडारड पाहायला मिळाली. तिकीट कापल्यानंतर नाराज झालेले उमेदवार एवढे संतापले होते की, त्यांची समजूत काढताना पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचीही दमछाक झाली. काही ठिकाणी तर थेट मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनाच बंडखोर उमेदवारांना फोन करून शांत करावं लागलं. पुढे काहीतरी बघू, योग्य वेळी संधी देऊ अशी आश्वासनं देत परिस्थिती आवरण्यात आली.

पण याच सगळ्या गोंधळात पिंपरी-चिंचवडमध्ये मात्र दोन उमदवार चक्क नशिबवान ठरले. कारण त्यांना एका नव्हे तर दोन पक्षांकडून अधिकृत उमेदवारी मिळाली आहे. विशेष म्हणजे दोन्ही पक्षांनी त्यांना एबी फॉर्महीदिले आहेत.



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २० ब आणि ३० अ या दोन जागांवर हा अनोखा पेच निर्माण झाला आहे. प्रभाग २० ब साठी नीलम म्हात्रे यांना शरद पवार गट राष्ट्रवादी आणि ठाकरे गट शिवसेना -दोन्हींकडून एबी फॉर्म मिळाले आहेत. तर प्रभाग ३० अ साठी संदीप गायकवाड यांना शरद पवार गट राष्ट्रवादी आणि शिंदे गट शिवसेना -या दोन्ही पक्षांनी उमेदवारी दिली आहे.

नियमाप्रमाणे या उमेदवारांनी एका पक्षाचा एबी फॉर्म जोडून अर्ज दाखल करणे अपेक्षित होते. मात्र त्यांनी दोन्ही पक्षांचे एबी फॉर्म जोडून अर्ज दाखल केले. विशेष म्हणजे छाननीत हे दोन्ही अर्ज वैध ठरले. त्या टप्प्यावर एका पक्षाची उमेदवारी मागे घेण्याची संधी होती, पण तीही वापरण्यात आली नाही. त्यामुळे आता अर्ज मागे घेण्याच्या अंतिम तारखेपर्यंत या दोघांकडे एका पक्षाची उमेदवारी सोडण्याचा पर्याय असणार आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## जगातील ६ सर्वात विचित्र आजार; वाचून बसेल धक्का

वैद्यकीय क्षेत्रात आजवर अनेक शोध लागले असले तरी निसर्गाचे आणि मानवी शरीराचे काही गुपित विज्ञानालाही कोड्यात टाकणारे आहेत. जगात असे काही अत्यंत दुर्मिळ आणि विचित्र आजार आहेत ज्यांच्याबद्दल ऐकल्यानंतर तुम्हाला विश्वास बसणार नाही. मानवी जीवनातील अनाकलनीय आणि अंगावर काटा आणणारे ६ आजार नेमके कोणते आहेत ते आपण आज सविस्तर पाहणार आहोत.

१. स्टोन मॅन सिंड्रोम : या आजाराचे शास्त्रीय नाव Fibrodysplasia Ossificans Progressiva (FOP) असे आहे. यात माणसाच्या शरीरातील स्नायू आणि ऊतींचे हळूहळू हाडांमध्ये रूपांतर होऊ लागते. यामुळे सांधे जखडले जातात आणि माणसाची हालचाल पूर्णपणे बंद होऊन त्याचे शरीर एका दगडाच्या पुतळ्यासारखे बनते.

२. प्रोजेरिया : तुम्ही अमिताभ बच्चन यांचा पा चित्रपट पाहिला असेल, तर हा आजार तुम्हाला माहीत असेल. यात लहान मुलांचे शरीर खूप वेगाने म्हातारे होऊ लागते. ८ - १० वर्षांचे मूलही वर्षांच्या वृद्धासारखे दिसू लागते. हा जनुकीय दोषामुळे होणारा अत्यंत दुर्मिळ आजार आहे.

३. वॉकिंग कॉर्प्स सिंड्रोम : याला Cotards Delusion असेही म्हणतात. हा एक मानसिक आजार आहे. यात रुग्णाला असा भास होतो की तो मरण पावला आहे किंवा त्याच्या शरीरातील अवयव सडले आहेत किंवा गायब झाले आहेत. काही रुग्णांना तर असे वाटते की त्यांचे अस्तित्वच उरलेले नाही.

४. लिस इन वंडरलँड सिंड्रोम : हा आजार प्रामुख्याने दृष्टी आणि मेंदूशी संबंधित आहे. यात माणसाला वस्तूंचे आकार चुकीचे दिसतात. एखादी छोटी वस्तू खूप मोठी दिसते किंवा मोठी वस्तू खूप छोटी भासते. कधीकधी स्वतःचे शरीर सुद्धा विचित्र आकाराचे वाटू लागते.

५ वेअरवॉल्फ सिंड्रोम : याचे शास्त्रीय नाव Hypertrichosis आहे. यात माणसाच्या संपूर्ण शरीरावर आणि चेहऱ्यावर प्राण्यांसारखे दाट केस येतात. हे केस इतकेजास्त असतात की माणसाचा चेहरा ओळखणे कठीण होते.

६ फॉरेन एक्सेंट सिंड्रोम : हा एक खूपच विचित्र आजार आहे. यात मेंदूला इजा झाल्यामुळे किंवा स्ट्रोक आल्यामुळे माणसाची बोलण्याची पद्धत अचानक बदलते. तो माणूस त्याच्या मातृभाषेतच बोलतो, पण त्याचा उच्चार एखाद्या परदेशी व्यक्तीसारखा (उदा. अमेरिकन किंवा रशियन) वाटू लागतो.

यातील बहुतांश आजार हे जनुकीय दोष किंवा मेंदूच्या विशिष्ट भागाला झालेल्या इजेमुळे उद्भवतात. जरी हे आजार विचित्र वाटत असले तरी जगभरातील अनेक रुग्ण आजही या वेदनादायी स्थितीचा सामना करत आहेत. वैद्यकीय शास्त्र यावर उपचार शोधण्यासाठी रात्रंदिवस प्रयत्न करत असून भविष्यात यातील काही आजारांवर मात करणे शक्य होईल अशी आशा तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## संक्षिप्त

### नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी २४० मद्यपी वाहनचालकांवर कारवाई

**पिंपरी चिंचवड, ता. २ :** शहरात नवीन वर्ष २०२६ चे स्वागत होत असतानाच वाहतूक पोलिसांनी मद्यपी वाहनचालकांविरोधात मोठी मोहीम राबवली आहे. थर्टी फर्स्टच्या सेलिब्रेशनमध्ये अनेक लोक दारू पिऊन गाड्या चालवत असल्याचे दिसून आले. अशा चालकांमुळे रस्त्यावरील इतर नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, ही बाब लक्षात घेऊन पोलिसांनी शहरात ठिकठिकाणी कडक नाकाबंदी केली होती. या विशेष तपासणीमध्ये एकूण २४० चालक मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवताना पकडले गेले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, वाहतूक शाखेच्या १३ विभागांनी मिळून शहरातील ४७ मोक्याच्या ठिकाणी ही तपासणी मोहीम राबवली. यामध्ये २२० दुचाकीस्वार आणि २० चारचाकी गाड्यांच्या चालकांवर ड्रंक अँड ड्राईव्ह अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या सर्व चालकांविरोधात आता गुन्हा दाखल केला जाणार आहेत. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे आणि सह आयुक्त डॉ. राशीकांत महावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. वाहतूक शाखेचे उपायुक्त विवेक पाटील यांनी सांगितले की, रस्ते अपघात रोखण्यासाठी आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची होती. पोलिसांनी केवळ दंडात्मक कारवाई न थांबता अशा चालकांवर कडक कायदेशीर पावले उचलली आहेत.

# अखेर ‘मुक्या अंकल’ ची पॉस्को गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता

**विशाल कदम**

करमाळा, ता. १३ : देवाकडून मिळणारा न्याय जरी उशिरा मिळत असला तरी तो अचूक आणि योग्य मिळतो, कारण देव कधीही अन्याय करत नाही. भगवान केघर देर है, अंधेर नहीं याच म्हणीची प्रचीती करमाळा तालुक्याला आज आली आहे. मागील दोन वर्षापूर्वी बाललैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपी ‘मुक्या अंकल’ ला बार्शी (जि. सोलापूर) येथील पोक्सो विशेष व अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश विक्रमादित्य के. मांडे यांनी सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व तिचे पती महादेवाचे दर्शनाला २०२३ साली गेले होते. दर्शन घेऊन दुपारी घरी परतले असता, त्यांची चार वर्षांची मुलगी निर्भया घरात रडत बसलेली आढळली. रडण्याचे कारण विचारले असता, तिने कथितरित्या सांगितले की, ती मुक्या अंकलच्या घरी खेळण्यासाठी गेली होती. घरात कोणी नसताना आरोपीने निर्भयाला घरात बोलावून आतून कडी लावली व लैंगिक अत्याचार केला. यावेळी पिडीतेने मोठ्याने आरडाओरड केली असता आरोपीने तिचे तोंड दाबल्याचा प्रयत्न केला होता. अशी फिर्याद निर्भयाच्या आईने करमाळा पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार आरोपीच्या विरोधात पॉस्कोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन, करमाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजित जगदाळे यांनी आरोपी ‘मुक्या अंकल’ ला त्वरित अटक केली होती. व आरोपीला अटक केल्यानंतर पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपीला कोठडी सुनावली होती. तेव्हापासून सोलापूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले होते. या गुन्ह्याचा खटला बार्शी न्यायालयात सुरु होता. या खटल्यात आरोपी ‘मुक्या अंकल’ याच्यामार्फत ॲड. सच्चिदानंद लोणकर व ॲड. एम. ए. कदम हे केस लढत होते. खटल्यादरम्यान सरकारी पक्षाच्या वतीने पिडीत निर्भया, पिडीतेची आई (फिर्यादी), पिडीतेची मोठी बहीण, आज्जी, वैद्यकीय अधिकारी तसेच तपासिक नोंदविण्यात आल्या. ॲड. सच्चिदानंद लोणकर यांनी सर्व साक्षीदारांची सखोल उलटतपासणी करून साक्षींतील विसंगती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. तसेच मेडिकल रिपोर्ट देखील निगेटिव्ह असल्याचे पुरावे सादर केले. हेच युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी ‘मुक्या अंकल’ याची लैंगिक अत्याचारासह अन्य सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली आहे.

### जीत आखिर सच्चाई की हुई


'मुक्या अंकल' हा करमाळा तालुक्याच्या पश्चिम भागात राहतो. तो विशेष मुलगा असूनदेखील त्याचे आठवीपर्यंतचे शिक्षण झाले आहे. आई वडिलांच्यावर आपला भार पडून नये म्हणून तो काम सुद्धा करत होता. त्याची जन माणसात चांगली प्रतिमा होती. परंतु, कोणाचाही विश्वास न बसणारा आरोप त्याच्यावर लागला. आणि अख्ख्या गावाला याचा धक्का बसला. 'मुक्या अंकल' या गुन्ह्यांतर्गत त्याला तब्बल २ वर्ष न्यायालयात शिक्षा देखील भोगावी लागली आहे. परंतु, जीत आखिर सच्चाई की हुई! या वाक्याप्रचारा प्रमाणे त्याची निर्दोष मुक्तता झाली आहे.

## चतुःश्रृंगी येथील दोन अट्टल गुन्हेगार हद्दपार

पुणे, ता. २ : पुणे शहरातील चतुः श्रृंगी पोलीस स्टेशनच्या हद्दीत दहशत माजविणे, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणे तसेच विविध प्रकारचे अवैध धंदे चालविणाऱ्या अट्टल गुन्हेगारांविरोधात पुणे शहर पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करत दोन आरोपींना जिल्हा हद्दपार केले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच सामान्य नागरिकांचे सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आली आहे. चतुः श्रृंगीपोलीसस्टेशनच्या अभिलेखावरील तडीपार इसम आरोपी लक्ष्मण ऊर्फ नाना अंकुश पवार (वय ४४, रा. विधाते वस्ती, दत्त मंदिराजवळ, औंध, पुणे) याच्या विरोधात यापूर्वी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल होते. त्याच्या सततच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानुसार पोलीस उप-आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६(१)(अ)(ब) प्रमाणे दोघांना पुणे जिल्हा हद्दीतून दोन वर्षांच्या कालावधीसाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत.

# आयुष्मान भारत योजनेत आधार ई-केवायसी बंधनकारक

**दिल्ली, ता. २ :** देशातील गरीब व गरजू रुग्णांना मोफत उपचार मिळावेत, यासाठी केंद्र सरकारने आयुष्मान भारत योजना राबवली आहे. मात्र, या योजनेचा गैरवापर करून बनावट कार्ड तयार करण्याचे प्रकार वाढल्याने सरकारने नियम अधिक कडक केले आहेत. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने बेनिफिशियरी आयडेंटिफिकेशन सिस्टम अंतर्गत नवी व्यवस्था लागू केली असून, आता प्रत्येक लाभार्थ्यासाठी आधार आधारित ई-केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे.




नवीन नियमानुसार, लाभार्थ्यांची माहिती आधार कार्डशी अचूक जुळल्यावरच आयुष्मान कार्ड जारी केले जाणार आहे. यामुळे दुसऱ्याच्या नावावर कार्ड काढून उपचार घेण्याचे प्रकार थांबवण्यास मदत होणार आहे. तसेच, आयुष्मान कार्डमध्ये इच्छेनुसार नवीन सदस्य जोडण्याचा पर्याय सरकारने बंद केला आहे. आता केवळ २०११ च्या जनगणनेनुसार पात्र ठरणाऱ्या कुटुंबांतील सदस्यांचीच नोंद नियमाप्रमाणे करता येणार आहे. त्यामुळे एकाच कार्डवर अपात्र व्यक्तींची नावे नोंदवण्याला आळा बसणार आहे.

बनावट कार्ड ओळखण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाणार आहे. एखादे कार्ड संशयास्पद आढळल्यास एआय प्रणाली ते आपोआप ओळखून त्या कार्डवरील उपचार सुविधा तात्काळ स्थगित करते. त्यानंतर ऑडिटर्समार्फत सखोल चौकशी केली जाते.

२०१८ पासून आतापर्यंत जारी करण्यात आलेल्या आयुष्मान कार्डपैकी ६१,९३२ कार्ड संशयास्पद आढळली असून, त्यापैकी ४८,४३५ कार्डांची प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण झाली आहे. संबंधित संशयास्पद कार्डांची यादी जिल्हाधिकारी आणि मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आली असून, दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई सुरू आहे. नुकतेच एका कर्मचाऱ्याची भूमिका संशयास्पद आढळल्याने एसटीएफच्या अहवालावरून त्याला सेवेतून काढून टाकण्यात आले आहे.

दरम्यान, ज्या लाभार्थ्यांनी आयुष्मान कार्ड काढले आहे, मात्र अद्याप ई-केवायसी पूर्ण केलेली नाही, त्यांनी ती तातडीने करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ई-केवायसी न केल्यास योजनेचा लाभ बंद होऊ शकतो, तसेच नाव लाभार्थी यादीतून वगळले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी विलंब न करता आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## पत्नीने पतीच्या तोंडावर ओतला उकळता चहा

**पुणे, ता. २ :** पुण्यातीलकोथरूड भागात एका महिलेने तिच्या पतीवर उकळता चहा ओतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत पतीच्या चेहऱ्याला गंभीर इजा झाली असून पोलिसांनी याप्रकरणी पत्नीवर गुन्हा दाखल केला आहे. वसंतनगर परिसरात राहणारे २७ वर्षांचे रवी दीपक गागडे हे एका ठिकाणी सिक्युरिटी गार्ड म्हणून नोकरी करतात. त्यांचा दोन वर्षांपूर्वी २२ वर्षीय प्रिया नावाच्या तरुणीशी विवाह झाला होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून या पती-पत्नीमध्ये पैशांच्या कारणावरून सतत खटकेउडत होते.




नेमकी घटना ३१ डिसेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता घडली. प्रिया ही रवी यांच्याशी काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करत असताना रवी यांनी तिच्या बोलण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. रवी हे काहीच प्रतिसाद न देता डोळे मिटून झोपल्याचे नाटक करत होते. यामुळे प्रिया प्रचंड चिडली आणि तिने रागाच्या भरात स्वयंपाकघरातून गॅसवरचा उकळता चहा आणून थेट पतीच्या चेहऱ्यावर ओतला. या अचानक झालेल्या प्रकारामुळे रवी यांचे कपाळ आणि चेहरा भाजला असून त्यांना मोठा धक्का बसला आहे.जखमी झाल्यानंतर रवी यांनी लगेच ससून रुग्णालय गाठून वैद्यकीय उपचार घेतले. त्यानंतर त्यांनी कोथरूड पोलीस ठाण्यात पत्नीविरोधात रीतसर तक्रार दिली. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस कर्मचारी मोहन दळवी करत आहेत. पती-पत्नीमधील किरकोळ वादातून अशा प्रकारे टोकाचा निर्णय घेतल्याने परिसरात मोठी चर्चा सुरू आहे.

# पुणे मेट्रोत ६ कोटी ७१ लाख प्रवाशांची वर्षभरात स्वारी

**पुणे, ता. २ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवडकरांनी पुणे मेट्रोला चांगलाच पाठिंबा दिला आहे. गेल्या वर्षभरात म्हणजेच २०२५ मध्ये मेट्रोच्या दोन्ही मार्गांवरून तब्बल ६ कोटी ७१ लाख लोकांनी प्रवास केला. एवढंच नाही तर तिकीट विक्रीतून महामेट्रोला १०५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.



पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील वनाझ-रामवाडी आणि पिंपरी-चिंचवड-स्वारगेट या दोन्ही मार्गिका मागील वर्षी सप्टेंबरमध्ये पूर्णपणे सुरू झाल्या. सुरुवातीपासूनच प्रवाशांचा प्रतिसाद वाढत गेला. नव्या वर्षात ही संख्या आणखी वाढली आणि जून महिन्यात पहिल्यांदाच ५० लाख प्रवाशांचा टप्पा ओलांडला.

सणासुदीच्या काळात, विशेषतः गणेशोत्सवात मेट्रोला प्रचंड गर्दी झाली. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये तर प्रवासी संख्या ७० लाखांच्या पुढे गेली, तर उत्पन्नाने १० कोटींचा आकडा पार केला. यामध्ये सप्टेंबर महिना सर्वात गजबजलेला ठरला. त्या एकाच महिन्यात जवळपास ७५ लाख लोकांनी मेट्रोचा वापर केला, आणि सुमारे ११ कोटी ७० लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले.

दिवाळीनंतर थोडीफार घट झाली असली, तरी आजही दररोज साधारण दोन लाख प्रवासी मेट्रोने प्रवास करत आहेत. मार्गिकांपैकी वनाझ ते रामवाडी हा मार्ग सर्वाधिक व्यस्त ठरला असून, या मार्गावर वर्षभरात ३ कोटी ६५ लाख प्रवासी प्रवासात होते. तर पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या मार्गावर ३ कोटी ५ लाख प्रवाशांची नोंद झाली.

आता पुणेकरांसाठी आणखी एक आनंदाची बातमी म्हणजे हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात आहे. ही मार्गिका मार्च २०२६ मध्ये सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आयटी पार्क परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, पुणे मेट्रोचे जाळे आणखी मजबूत होणार आहे.

# पुण्यातील इराणी चहाच्या हॉटेलमध्ये मद्यधुंद तरुणाने घातला राडा

**पुणे, ता. २ :** पुण्यातील खराडी भागात एका मद्यधुंद तरुणाने हॉटेलमध्ये शिरून जोरदार राडा केल्याची घटना घडली आहे. खराडी येथील झेन्सार आयटी पार्क जवळ असलेल्या एका प्रसिद्ध इराणी चहाच्या हॉटेल मध्ये रात्री १० च्या सुमारास हा सर्व प्रकार घडला. ३२ वर्षांचा आतिष बाळासाहेब भगत हा तरुण पूर्णपणे नशेमध्ये होता. त्याने हॉटेलमध्ये येऊन ‘हॉटेल एवढ्या रात्रीपर्यंत का सुरू ठेवले?’ असा निरर्थक प्रश्न विचारत तिथल्या कामगारांशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली.




भगत याने हॉटेलमधील साहित्याची फेकाफेक करून तोडफोड केली. यावेळी त्याने हॉटेल कर्मचारी नीरज गौतम याला जिवे मारण्याची धमकी दिली आणि अश्लील भाषेत शिवीगाळ केली. या अचानक झालेल्या प्रकारामुळे हॉटेलमधील कामगार आणि ग्राहक भयभीत झाले होते. कर्मचाऱ्यांनी तातडीने या घटनेची माहिती हॉटेल मालक नीलेश गुरव यांना दिली, त्यांनी संपूर्ण प्रकार पोलिसांना सांगितला.

खराडी पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी गोंधळ घालणाऱ्या आतिष भगतला ताब्यात घेतले. त्याची वैद्यकीय तपासणी ससून रुग्णालयात करण्यात आली असून, पोलिसांनी त्याला अटक केली आहे. हॉटेल व्यवसायिकांना विनाकारण त्रास देऊन दहशत निर्माण करणाऱ्या या तरुणावर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक सावन आवारे या प्रकरणाचा पुढील तपास करत असून, अशा समाजसंटकांवर कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# प्रियकराला घरी बोलावून प्रेयसीने कापला ‘तो’ पार्ट

**मुंबई, ता. २ :** शहरातील सांताक्रुझ पूर्व येथील कलिना परिसरातून धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रियकराने लग्नास नकार दिल्याच्या रागातून एका महिलेने आपल्या प्रियकराचे धारदार चाकूने लिंग कापल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात ४४ वर्षीय पुरुष गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



जखमी व्यक्तीचे नाव जोगिंदर लखन महतो (वय ४४) आहे. तो जांभळीपाडा परिसरात राहायला आहे. तर कंचनदेवी राकेश महतो (वय २५) असे आरोपी महिलेचे नाव आहे. खासगी वाहन चालकाचे तो काम करत आहे. मागील १५ हून अधिक वर्षापासून तो या भागात रहायला आहे.

या प्रकरणी वाकोला पोलिसांनी आरोपी महिलेविरोधात गंभीर दुखापत केल्याप्रकरणी व धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. जखमी व्यक्तीचे नाव गेल्या १८ वर्षांपासून ते कुटुंबासह या भागात वास्तव्यास आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी जोगिंदर याचे त्यांच्या बहिणीच्या नणंदेसोबत, कंचनदेवी राकेश महतो (वय २५) यांच्यात गेल्या ६ ते ७ वर्षांपासून प्रेम संबंध होते. कंचन महतो ही जोगिंदरवर त्याच्या पत्नीला सोडून तिच्यासोबत लग्न कर म्हणून दबाव टाकत होती. यामुळे दोघांमध्ये वारंवार वाद होत होते.

त्यानंतर जोगिंदर हे मुंबई सोडून परराज्यात गेले. मात्र तरीही कांचन त्यांना मुंबईला परत येऊन लग्न करण्याची धमकी देत होती. १९ डिसेंबर रोजी जोगिंदर मुंबईत परतले होते आणि त्यांनी संबंधित महिलेपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला होता. ३१ डिसेंबर रोजी रात्री सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास नववर्षाच्या निमित्ताने मिठाई देण्याच्या बहाण्याने कंचनदेवीने जोगिंदरला घरी बोलावले. घरातील मुले झोपल्यानंतर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात जोगिंदर गंभीर जखमी झाले.

जखमी अवस्थेत तो कसाबसा घरी पोहोचला आणि कुटुंबीय व शेजाऱ्यांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर त्यांना प्रथम देसाई रुग्णालयात, पुढे सायन रुग्णालयात हलवण्यात आले. माहिती मिळताच वाकोला पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी आरोपी महिलेविरुद्ध गंभीर दुखापत व धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# अजमेर-बिकानेर एक्स्प्रेसच्या फेऱ्यांमध्ये वाढ झाल्यामुळे दौंड

## सोलापूरमधील प्रवाशांना होणार फायदा

**पुणे, ता. २ :** प्रवाशांची वाढती गर्दी आणि सण-उत्सवाच्या काळात होणारी अतिरिक्त प्रवासाची गरज लक्षात घेऊन मध्य रेल्वेकडून अनेक विशेष रेल्वे गाड्यांच्या फेऱ्यांना मुदतवाढ देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यासह उत्तर भारत आणि राजस्थानकडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. साईनगर शिर्डी-बिकानेर, खडकी-हिसार, दौंड-अजमेर आणि सोलापूर-अजमेर या मार्गांवरील साप्ताहिक विशेष गाड्यांच्या फेऱ्या वाढविण्यात आल्या असून, त्यामुळे प्रवास अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०४६१५ आणि ०४७१६ साईनगर शिर्डी-बिकानेर-साईनगर शिर्डी या साप्ताहिक विशेष गाड्यांच्या फेऱ्यांना ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या मार्गावर एकूण १० अतिरिक्त फेऱ्या वाढविण्यात आल्या आहेत. शिर्डी दर्शनासाठी येणारे भाविक तसेच राजस्थानकडे जाणारे प्रवासी मोठ्या संख्येने या गाडीचा वापर करतात, त्यामुळे या निर्णयाचा त्यांना मोठा फायदा होणार आहे.



तसेच गाडी क्रमांक ०४७२५ आणि ०४७२६ हिसार-खडकी-हिसार या साप्ताहिक विशेष गाड्यांच्या फेऱ्या २६ जानेवारीपर्यंत वाढविण्यात आल्या आहेत. या मार्गावर एकूण ८ फेऱ्यांची वाढ करण्यात आली असून, पुणे परिसरातील औद्योगिक भाग आणि लष्करी क्षेत्राशी संबंधित प्रवाशांसाठी ही गाडी उपयुक्त ठरणार आहे.

गाडी क्रमांक ०९६२५ आणि ०९६२६ अजमेर-दौंड-अजमेर या साप्ताहिक विशेष गाड्यांच्या एकूण १० फेऱ्यांना ३० जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दौंड हे महत्त्वाचे रेल्वे जंक्शन असल्याने मराठवाडा, विदर्भ आणि दक्षिण महाराष्ट्रातील प्रवाशांना या गाडीचा लाभ होणार आहे. याचबरोबर गाडी क्रमांक ०९६२७ आणि ०९६२८ अजमेर-सोलापूर-अजमेर या साप्ताहिक विशेष गाड्यांच्या फेऱ्यांना २९ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, या मार्गावर ८ अतिरिक्त फेऱ्या वाढविण्यात आल्या आहेत.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना तिकीट आरक्षण, वेळापत्रक आणि थांब्यांची सविस्तर माहिती अधिकृत संकेतस्थळ किंवा नजीकच्या रेल्वे स्थानकावरून घेण्याचे आवाहन केले आहे. वाढीव फेऱ्यांमुळे गर्दी कमी होऊन प्रवास अधिक सुरक्षित आणि आरामदायी होईल, असा विश्वास रेल्वे प्रशासनाने व्यक्त केला आहे.